सकाळ
TODAY
कोल्हापूर, सोमवार, १० नोव्हेंबर २०२५

# डॉ. प्रणिता मगदूम यांना पीएच.डी.पदवी


प्रणिता मगदूम

**माजगाव** : माजगाव (ता. पन्हाळा) येथील डॉ. प्रणिता प्रकाश मगदूम यांना शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी.पदवी मिळाली. डॉ. प्रणिता यांनी 'नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करून नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीमध्ये मल्टीफंक्शनल टेक्सटाईन' (बहुउद्देशीय कापड) विषयावर यशस्वीरीत्या संशोधन पूर्ण केले. प्रणिता यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण माजगाव तर महाविद्यालयीन शिक्षण विवेकानंद कॉलेजमध्ये पूर्ण केले. श्री हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे संस्थापक प्रकाश मगदूम यांच्या त्या कन्या आहेत. त्यांना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश घोसावी व डॉ. के. के. शर्मा यांचे मार्गदर्शन मिळाले. पती गोरखनाथ पाटील, हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा संगीता मगदूम यांचे प्रोत्साहन मिळाले.

कोल्हापूर
रविवार, दि. ९ नोव्हेंबर २०२५
▸ वर्ष : १ ▸ अंक : ४६ ▸ पाने : १० मूल्य ₹ ५
पो.र.नं. SGL/25/2025/2027 RNI No. MAHMAR/2003/11365
दैनिक
जनप्रवास बातम्यांचा राजा

# अंबाबाई देवीच्या खांद्यापर्यंत सूर्यकिरणे

जनप्रवास : कोल्हापूर

करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात दक्षिणायन कालखंडातील किरणोत्सवाला आज (दि.९)पासून प्रारंभ होणार आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी तज्ज्ञांकडून किरणोत्सवातील अडथळ्यांची चाचणी करण्यात आली. गरूड मंडप उभारण्यापुर्वी सात दिवस किरणोत्सव झाला होता. आता गरूड मंडपाचे बांधकाम सुरू आहे. तरीही स्वच्छ वातावरण, अपेक्षीता अद्रता, हवेतील धुळीकण कमी असल्याने ५.४७ मिनिटांनी सूर्यकिरणे अंबाबाई देवीच्या खांद्यापर्यंत जावून डावीकडे लुप्त झाली. त्यानंतर देवीच्या आरती करण्यात आली.

किरणोत्सवासाठी हवामान निरभ्र असले तरी मार्गातील अडथळ्यांचे मोठे आव्हान आहे. दक्षिणायन आणि उत्तरायण अशा दोन कालखंडात किरणोत्सव होतो. यंदाचा दक्षिणायन कालखंडातील किरणोत्सव ९ ते १४ नोव्हेंबर दरम्यान होणार आहे. गतवर्षी किरणोत्सवातील अडथळे दूर करण्यासंदर्भात महापालिकेशी पत्रव्यवहार केला होता. परंतू अद्याप महापालिकेने किरणोत्सवातील अडथळे दूर केलेले नाहीत. किरणोत्सव चाचणीमध्ये शनिवारी सायंकाळी ५. ५ वाजता सूर्यकिरणे महाव्दार रोडवर आली होती. त्यानंतर ५.७ वाजता गरूड मंडप पाठीमागे, ५.२३ गणपती मंदिरमागे, ५.२४ कासव चौक, ५.३१ पितळी उंबरा, ५.३५ चांदीचा उंबरा, ५.३८ संगमरवरी पहिली पायरी, ५.४० संगमरवरी तिसरी पायरी, ५.४२ अंबाबाई चरणस्पर्श, ५.४५ अंबाबाई देवीच्या गुडघ्यापर्यंत आली. ५.४६ मिनिटांनी अंबाबाई देवीच्या कमरेपर्यंत आली. त्यानंतर हळूहळू ५.४७ मिनिटांनी सूर्यकिरणे अंबाबाई देवीच्या खांद्यापर्यंत जावून डावीकडे लुप्त झाली.



कोल्हापूर : करवीर निवासिनी अंबाबाईच्या किरणोत्सव चाचणी दरम्यान शनिवारी देवीच्या खांद्यापर्यंत आलेल्या सूर्यकिरणांनी गाभारा प्रकाशमय झाला होता.

## ७५ हजार भाविकांनी घेतले अंबाबाईचे दर्शन

करवीर निवासिनी अंबाबाईच्या दर्शनासाठी शनिवारी पहाटेपासूनच रांगा लागल्या होत्या. शनिवार व रविवार शासकीय सुट्टी असल्याने शनिवारी अंबाबाई देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दिवसभरात ७५ हजार १०६ भाविकांनी अंबाबाईचे दर्शन घेतले.

## स्वच्छ व निरभ्र आकाश

अंबाबाईचा दक्षिणायन किरणोत्सवाला आजपासून प्रारंभ होणार आहे. शनिवारी किरणोत्सवची चाचणी करण्यात आली. या चाचणी दरम्यान स्वच्छ व निरभ्र आकाश असल्याने किरणोत्सव पूर्ण क्षमतेने होईल.

डॉ. मिलींद कारंजकर
(किरणोत्सव अभ्यासक, विवेकानंद कॉलेज)

10.11.25
10.11.25

तरुण भारत संवाद
रविवार, ९ नोव्हेंबर २०२५

# किरणोत्सव : सूर्यकिरणे अंबाबाईच्या खांद्यापर्यंत

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

रविवारपासून सुरू होणाऱ्या करवीर निवासिनी अंबाबाईच्या किरणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी तिसऱ्यांदा पाहणी करण्यात आली. स्वच्छ वातावरण आणि ढगांचा अडथळा नसल्यामुळे ५ वाजून ४७ मिनिटांनी सूर्यकिरणांनी देवीच्या खांद्याला स्पर्श केला.

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती आणि स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या पदार्थविज्ञान व खगोलशास्त्र विभागाच्या तज्ज्ञांकडून ही पाहणी झाली.

शनिवारी महाद्वार रोड कमानीजवळ ५.५ वाजता सूयकिरणे होती. गरुड मंडपाजवळ ५.७ वाजता, गणपती मंदिरामागे ५.२३, कासव चौकात ५.२९, पितळी उंबरठ्याजवळ ५.३१, चांदीच्या उंबरठ्याजवळ ५.३५, संगमरवरी पायरीजवळ ५.४० वाजता पोहोचली होती. तर ५ वाजून ४२ मिनिटांनी सूर्यकिरणांनी देवीचा चरण स्पर्श केला. त्यानंतर ५.४५ वाजता गुडघ्यापर्यंत, ५.४६ वाजता कमरेच्या वर पोहोचली. तर ५ वाजून ४७ मिनिटांनी देवीच्या खांद्याला सूर्यकिरणांनी स्पर्श केला. हा किरणोत्साव पाहण्यासाठी भाविकांनी मंदिरात गर्दी केली होती.



**कोल्हापूर : अंबाबाईच्या किरणोत्सव चाचणीच्या पार्श्वभूमीवर शनिवारी सूर्यकिरणे देवीच्या खांद्यापर्यंत पोहोचली.**